महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८० वा | दिनांक : ०८/०९/२०२५ | वार : सोमवार

## अजित पवार तुम्ही पोल्ट्रीवरचे कामगार शोभता - लक्ष्मण हाके



**सोलापूर** : राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाबाबतीतल्या मागण्या मान्य केल्यानंतर राज्यातील ओबीसी समाज दुखावला गेल्याचे बोलले जात आहे. तसेच मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे दाखवून दिली आहे. तर दुसरीकडे ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके हे सातत्याने पवार कुटुंबावर टीका करत आहेत. शरद पवारांनीच जरांगे नावाचे भूत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवले असल्याची टीका त्यांनी शुक्रवारी केली होती. आता पुन्हा एकदा त्यांनी अजित पवारांवर टीका केली आहे.

महाराष्ट्र हा कोणाच्या बापाची जहागिरी नाही. हे राज्य अठरापगड जमाती आणि भटक्या-विमुक्तांचे आहे, हे दाखवून द्या, असे आवाहन लक्ष्मण हाके यांनी केले आहे. ते म्हणाले, सरकार १० टक्के मराठा समाजाला घाबरत असेल तर आपल्याकडे ५० ते ६० टक्के समाज आहे. त्यामुळे ओबीसी समाजाचे शोषण पुरे झाले. इथले सरकार, आमदार आणि खासदारांना आपण पळता भुई थोडी करू. रविवारी सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते.

अजित पवारांवर टीका करताना लक्ष्मण हाके म्हणाले, अजित पवार यांनी यशवंतराव चव्हाण यांचे नाव घेऊ नये. शरद पवार यांचा वारसा सांगू नये. अजित पवार तुम्ही पोल्ट्रीवरचे कामगार शोभता. यूपीएससी झालेल्या अधिकाऱ्याला दम देणे शोभत नाही त्यांनी भाषा सुधारावी. जर ते होत नसेल तर यशवंतराव चव्हाण यांचे नाव घेऊन नका. अजित पवार तुम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर वगैरे कळणार नाही, तुमची ती कुवत किंवा लायकी नाही. तुम्हाला कारखाना चालवण्याशिवाय दुसरे काय जमते?, अशा शब्दात हाके यांनी टीका केली आहे.

## मनोज जरांगे केवळ स्वत:ची बुवाबाजी चालवतात - डॉ. संजय लाखे पाटील



**जालना** : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आता मराठा आंदोलक आणि अभ्यासकांमध्येच मतभेद वाढताना दिसत आहेत. मराठा समन्वयक आणि अभ्यासक डॉ. संजय लाखे पाटील यांनी मनोज जरांगे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. "मराठा आरक्षण हा जगन्नाथाचा रथ आहे, मात्र जरांगेंना वाटते की हा रथ फक्त मी एकटाच ओढत आहे," असे म्हणत त्यांनी जरांगे यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे केले. तसेच जरांगे केवळ स्वत:ची बुवाबाजी चालवत आहेत. त्यांना कायदा आणि शासन आदेशातील फरक कळत नाही. ते समस्त मराठा समाजाचे नाही, तर कुणबी समाजाचे नेतृत्व करत असल्याचे लाखे पाटील म्हणाले.

मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनानंतर सरकारने दिलेल्या जीआर वरून राज्यातील समन्वयकांनी मनोज जरांगे यांना धारेवर धरले आहे. एकीकडे शासनाने जीआर जारी केल्यानंतर मराठा समाजात आनंद साजरा केला जात असताना, दुसरीकडे या जीआरमुळे मराठ्यांना लाभ होणार नसल्याचा दावा काही मराठा अभ्यासकांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मराठा समन्वयक संजय लाखे पाटील यांनी मनोज जरांगेंवर हल्ला चढवला आहे.

डॉ. लाखे पाटील यांनी जरांगे यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. मनोज जरांगे स्वत:चे मत वाढवण्यासाठीच आंदोलन करतात. ते समस्त मराठा समाजाचे नव्हे तर कुणबी समाजाचे नेतृत्व करत आहेत. जरांगेंची एकही मागणी वैद्य, कायदेशीर, घटनात्मक आणि मराठा समाजाला आरक्षण मिळावे या पद्धतीची नाही. त्यांना कायदा आणि शासन आदेश यातला फरकच कळत नाही. समाजाने जरांगेवर केवळ फुलांवर १०० कोटी उधळले, पण चुकीच्या पद्धतीने आंदोलन चालवून मराठा समाजाचे नुकसानच होत आहे, असे संजय लाखे म्हणाले.

मनोज जरांगे आंदोलनातून स्वत:ची बुवाबाजी चालवतात. त्यांना स्वत: पुढून कॅमेरा जायला नको असे वाटते. मराठा समाजातील घटनात्मक आवाज आणि अभ्यास असलेल्या लोकांना टार्गेट करण्याचं काम ते सूत्रबद्ध पद्धतीने करतात. मुंबईतील आंदोलनादरम्यान शासनाने दिलेला ड्राफ्ट जरांगेंना आधीच माहीत होता. केवळ सरकारचा जयजयकार करण्यासाठी गुलाल उधळला गेला. आधीच सरकारसोबत ड्राफ्ट तयार करतात आणि मग अभ्यासकांना बोलावून चर्चा करण्याचे नाटक करून समाजाची फसवणूक करतात, असा आरोप संजय लाखे यांनी केला.

## सर्वांना मान्य असणारा जीआर काढला तर हा ओबीसींचा वाद का? - रोहित पवारांचा हल्लाबोल



**पुणे** : मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासंदर्भातील मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या असून यामुळे राज्यातील ओबीसी समाज नाराज असल्याचे बोलले जात आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे बोलूनही दाखवली आहे. तसेच ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यासह पवार कुटुंबावर देखील हल्लाबोल सुरू केला आहे. आता यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे.

रोहित पवार म्हणाले, मराठा समाजाचे आंदोलन होणार हे सरकारला तीन महिने आधी माहीत होते. होम डिपार्टमेंटला किती लोक येणार याचा अंदाज होता. आझाद मैदानापर्यंत आंदोलन पोहोचले हे चांगली गोष्ट आहे. आंदोलकांना काही सुविधा मिळाल्या नाहीत हे दुर्दैव आहे. आंदोलन हाताबाहेर गेले हे त्याचेच कारण आहे. कोर्टाने यात लक्ष घातले आणि त्यानंतर समितीने चर्चा करायला सुरुवात केली. लोक येणार होते तर आधीच का तयारी केली नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, मुंबईकरांना अडचण होईल आणि त्यावर प्रश्न उपस्थित होऊन मुंबई महापालिकेत भाजपला फायदा होईल असे वातावरण तयार केले गेले. गिरीश महाजन हे समितीत होते, ते ओबीसी नेते आहेत. सर्वांना मान्य असणारा जीआर काढला तर हा ओबीसींचा वाद का? सरकारमध्ये एक मत नाही का? छगन भुजबळ यांना माहिती नव्हती का? लोकसभेच्या आधी हा निर्णय का नाही घेतला? अशी प्रश्नांची सरबत्तीच रोहित पवारांनी केली आहे.

लोकसभा, विधानसभा निवडणुकांनंतर हे सुरू ठेवले. मराठा आरक्षणाचा जीआर काढला आणि लगेच ओबीसी समिती नेमली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हा वाद तुमचा सुरूच असणार आहे का? मराठा-ओबीसी वाद सुरू झाला आहे. यात सरकारकडून आगीत तेल टाकून वाद वाढवण्याचे काम सुरू असल्याची टीका रोहित पवारांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ सप्टेंबर २०२५


## प्रा. रतनलाल सोनग्रा यांचे गौरवोद्गार ; ११४४ पानांच्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहात



**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककलांपासून, शास्त्रीय संगीत, गायन, वादन, नृत्य तसेच तंत्रज्ञ, साहित्यिक, अभिनेते, अशा सर्व कलाकारांची माहिती असलेला ‘कलासाधकांचा नगरी आहेर’ हा ग्रंथ नगरच्या कलाक्षेत्राचा माहितीकोष असून, लेखक-संपादक शाहीर अरुण आहेर यांचे हे अतुलनीय कार्य आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत तथा साहित्यिक प्रा. रतनलाल सोनग्रा यांनी काढले. शाहीर अरुण आहेर लिखित व संपादित, ११४४ पानांच्या या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा नुकताच येथे झाला. त्या वेळी डॉ. सोनग्रा अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या वेळी महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर, माजी नगरसेवक अनिल बोरुडे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, डॉ. सागर बोरुडे, राज्य चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. संजय खामकर, शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सचिव सुनील गोसावी, खजिनदार भगवान राऊत, न्यू आर्ट्स कॉलेजचे माजी प्राचार्य खासेराव शितोळे, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सूफी गायक पवन नाईक, मराठी साहित्य परिषदेच्या सावेडी शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलूलकर, कवी सुभाष सोनवणे, ग्रंथाचे सहायक संपादक दीपक रोकडे, संतोष कानडे आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील ख्यातनाम उद्योजक आणि मराठी साहित्य परिषदेच्या सावेडी शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी त्यांच्या शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनतर्फे या ग्रंथाचे प्रकाशन केले.यावेळी प्राचार्य खासेराव शितोळे म्हणाले, की अहिल्यानगर जिल्ह्याने राज्याला नृत्य, नाट्य, संगीत, गायन, वादन, साहित्य आणि लोककला अशा विविध क्षेत्रांतील नामवंत कलावंत दिले. यातील बहुतेक कलावंत बहुजन वर्गातील होते. त्यामुळे उपेक्षित राहिलेल्या अशा कलाकारांना न्याय देण्याचे काम शाहीर अरुण आहेर यांनी या ग्रंथातून केले आहे. हा ग्रंथ जिल्ह्यातील प्रत्येक शाळा महाविद्यालयातील ग्रंथालयापर्यंत पोहोचला पाहिजे जेणेकरून हा ग्रंथ वाचून अनेक नवोदित कलावंतांना प्रेरणा मिळेल आणि त्यांच्यातून भविष्यात अनेक कलावंत निर्माण होतील. संभाजी नगरचे विख्यात कवी समीक्षक डी.बी. जगतपुरिया म्हणाले, या ग्रंथात शाहीर आहेरांनी लेखक कलावंत व इतर गुणवंतांचा सत्वसार मांडलाय. प्रस्तावनाकार थोर विचारवंत आचार्य रतनलालजी सोनग्रा, शाहीर आहेर यांचे सांस्कृतिक योगदान वंदनीय आहे.लेखक-संपादक शाहीर अरुण आहेर म्हणाले, जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील कलावंतांचे कार्य मला खुणावत होते. या कलावंताच्या कामाचे कुठे तरी दस्तऐवजीकरण होणे गरजेचे होते. त्याच प्रामाणिक भावनेतून मी या ग्रंथाचा मनोदय व्यक्त केला व तो पूर्णत्वास नेण्यासाठी अनेक मदतीचे हात पुढे आले. त्यापैकी मसाप सावेडी शाखेचे अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी या ग्रंथ प्रकाशनासाठी मला मोलाची मदत केली. त्याबद्दल मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो. माझे ध्येय आणि उद्दिष्ट साध्य झाले आहे. सहायक संपादक दीपक रोकडे यांनी ग्रंथ निर्मितीची पार्श्वभूमी स्पष्ट केली. प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, संजय खामकर, नगरसेवक संपत बारस्कर, सुनील गोसावी, संतोष कानडे, सुभाष सोनवणे आदींची भाषणे झाली.गायक पवन नाईक यांनी प्रास्ताविक केले. वीणा दिघे यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा आहेर यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात कल्याणी कामतकर यांच्या कथक नृत्यालयाच्या नृत्यांगना वैष्णवी पाटोळे, वैभवी चव्हाण, राधिका देशमुख, सृष्टी उदमले यांच्या नटराज वंदन नृत्याने झाली. समारंभासाठी रोहिणी अरुण आहेर, इंजि. सोनाली अश्विनीकुमार आहेर, उद्योजक अश्विनीकुमार आहेर, प्रा. अवधूत अरुण आहेर, संतोष सुर्वे, देवीकृपा सांस्कृतिक मंडळ यांनी परिश्रम घेतले.

## शिक्षक दिन आणि पालक मेळावा मोठ्या उत्साहात साजरा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील तिसगाव विद्यालय तिसगाव, येथे शिक्षक दिन व पालक मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्र. मुख्याध्यापक चंद्रभान पवार हे होते .तसेच प्रमुख पाहुणे म्हणून तिसगाव ग्रामपंचायतचे सदस्य संजय राठोड, योगेश राठोड हे होते. मुला मुलींनी शिक्षक शिक्षकांची भूमिका येथेच वठवून कार्यक्रमाचा उत्साह वाढवला यावेळेस विद्यार्थीनी राणी जाधव म्हणाली, शिक्षक काम किती कठीण आहे हे मला आज कळाले आपण बसल्या जागी गोंधळ घालून शिक्षकांना त्रास देतो पण शिकवत असताना त्यांना किती तयारी करावी लागत असेल याचा मला प्रत्यय आला याप्रसंगी मुलांचे भाषणे झालेत तसेच शिक्षकांनी व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच संस्थेने सर्व शिक्षकांना एक -एक पेन गिफ्ट करून सर्वांचा सन्मान केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशनी राठोड हिने केले तसेच पी एस राठोड यांनी आलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानले.तसेच आज या निमित्ताने पालक मेळावा देखील आयोजित केला होता,त्यास पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला, व शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले आणि अभिप्राय देखील नोंदवले.तसेच सत्यशोधक महिला विकास मंडळ तर्फे शिक्षकांना उच्च दर्जाचे पेन सप्रेम भेट म्हणून देण्यात आले.

## अजित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्या निमित्त शेतकऱ्यांशी हितगूज



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** पडेगाव येथून जवळच असलेल्यादिनांक 6 सप्टेंबर रोजी मौजे दौलताबाद,केसापुरी तांडा येथील प्रगतशील शेतकरी यांच्याशी कृषी मंत्रालय सचिव अजित शहा यांनी चर्चा करून त्यांची उत्पादन खर्च व उत्पन्न याबाबत माहिती घेतली यामध्ये प्रगतशील शेतकरी केसापुरी तांडा येथील विलास जाधव यांचे शेडनेट मधील बियाणे उत्पादन कार्यक्रम याबाबत माहिती घेऊन शेतकरी सिलेक्शन व्हरायटी मिरची "विलासराणी"याबाबत माहिती जाणून घेऊन प्रोसेस समजावून घेतली. त्यानंतर केसापुरी प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर सुरासे यांनी दौलताबाद फीग अंजीर व टोमॅटो याबाबत माहिती दिली टोमॅटोची विक्री व्यवस्था व त्याची प्रोसेसिंग करावे करून उत्पादनात वाढ करणे संदर्भात श्री अजित शहा यांनी सुचित केले. दौलताबाद येथील प्रगतशील शेतकरी सुरेंद्र जगधने पिक स्पर्धा पिक भुईमूग जिल्हा प्रथम क्रमांक यांचे भुईमुगाबाबत उत्पादन वाढवण्याचे सूत्र शहा यांनी समजावून घेतले. त्यांच्या शेतामध्ये एस आर टी तंत्रज्ञान (शून्य मशागत) पद्धत समजावून घेत सेंद्रिय कर्ब वाढल्याचे शेतकऱ्यांनी या ठिकाणी सांगितले. शेतकऱ्यांशी त्यांच्या विविध प्रश्नांवरती चर्चा करून विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक पातळीवर संबंधित योजनेमध्ये कोणत्या गोष्टी अंतर्भूत करणे गरजेचे आहे जेणेकरून शेतकऱ्यांच्या उत्पादनात भरीव वाढ होईल याबाबत अभिप्राय त्यांनी घेतले त्याचप्रमाणे शासनाच्या विविध योजना यांचा शेतकरी बांधवांनी लाभ घेऊन त्यांच्या उत्पादन व उत्पन्नात वाढ करावी असे मत व्यक्त केले केली.सोबत मुख्य कार्यकारी अधिकारी सिट्रस इस्टेट श्री रामनाथ कारले, सहाय्यक कृषी अधिकारी दौलताबाद रंगनाथ पिसाळ आणि शेतकरी बांधव उपस्थित होते


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ सप्टेंबर २०२५

## श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चापानेर येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा



**चापानेर : (ता. ५)** शिक्षक दिन व स्वयंशासन दिन हा श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चापानेर येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळपासूनच असलेल्या उत्साही वातावरणात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे भेट कार्ड आपल्या शिक्षकांसाठी बनवले होते अतिशय वेगवेगळ्या प्रकारचे नाविन्यपूर्ण असे भेटकार्ड शिक्षकांना देऊन विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली, तसेच वर्ग सातवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावत अध्यापन कार्य करून नवीन शैक्षणिक अनुभूती घेतली. तदनंतर झालेल्या कार्यक्रमात भारताचे माजी राष्ट्रपती , शिक्षणतज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारी सविस्तर अशी भाषणे विद्यार्थ्यांनी केली, व स्वयंशासन दिनातील शिक्षकांच्या भूमिकेत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून देताना दिवसभरातील अनुभव कथन केले. यावेळी संस्था अध्यक्ष श्री दशरथ सोमासे यांच्यासह संचालक केतन पवार हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कौशल्य सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप वाकडे, वर्षा जाधव, आकांक्षा वैष्णव, दुर्गा वैष्णव, दिव्या लोखंडे, चंचल कदम, योगिता जाधव, अभिलाषा वारखिंडे आदी शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचारी अंकुश राठोड, कविता हिरे, अजय पवार आदींनी परिश्रम घेतले

## कुटुंबाला एकसंघ ठेवण्याचा आदर्श हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्यच - सिने अभिनेत्री अलका कुबल




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुलांना संस्कारयुक्त बनविताना पालकांनी स्वतः आई-वडील, सासू-सासरे व वडीलधारी मंडळींचा आदर, निस्वार्थ सेवाभाव जोपासून त्यांना आपल्या कुटुंबाच्या परंपरा आणि ज्येष्ठांचा त्याग, परिश्रम व कष्ट याची जाणीव करून देणे. समाजात आपले कुटुंब अधिक सुसंस्कारित बनवून ते अधिक मजबूत व एकसंघ ठेवण्याचा आदर्श हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्यच असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल यांनी केले. रोटरी क्लब मुरूम सिटी च्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा गौरव सोहळा रत्नमाला मंगल कार्यालयात शुक्रवारी (ता. 5) रोजी आयोजित सोहळ्यात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीराम कुलकर्णी होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कल्लाप्पा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी अनुसया मिरकले, वैभव वेल्हाळ, संगीता माकणे, तनुजा गाढवे, दत्ता राठोड, प्रिया वाकडे, योगेश कोडलंगरे, जाफरसाहेब मुल्ला, मुकेश सोमवंशी, उल्हास घुरघुरे, शंकर आसबे, प्रा. डॉ. अरुण बावा यांना अलका कुबल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, रोटरीचा नेशन बिल्डर अवार्ड देऊन शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. गौरी आरास सजावट सन्मान कविता जाधव (प्रथम) सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख 2001, शिल्पा पांचाळ (द्वितीय) सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख 1501, मित्रवंदा जाधव (तृतीय) सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख 1001 तर सुंदर मुखवटा व आकर्षक गौरी मूर्ती अंजली सूर्यवंशी, आकर्षक झुला बैठक गौरी आरास स्वाती जाधव, उत्कृष्ट रोषणाई गौरी सजावट ललिता जाधव, उत्कृष्ट संदेश साक्षी महामुनी, उत्कृष्ट सांस्कृतिक देखावा वैशाली पोतदार, अपर्णा पोतदार तर डॉ. महेश स्वामी वाढदिवसानिमित्ताने विशेष सत्कार अलका कुबल यांच्या हस्ते करण्यात आला. कमलाकर मोटे, सुनिल राठोड, प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, कल्लाय्या स्वामी, ॲड. उदय वैद्य, मल्लिकार्जुन बदोले, प्रा. भूषण पाताळे, बाबासाहेब पाटील, प्रकाश रोडगे, डॉ. महेश स्वामी,डॉ. नितीन डागा, शिवकुमार स्वामी, डॉ. विलास खडके आदींनी पुढाकार घेतला. अध्यक्षीय समारोप प्रसंगी श्रीराम कुलकर्णी म्हणाले की, अशा समाज उपयोगी काम करणाऱ्या रोटरी सारख्या जागतिक सेवाभावी संस्थेकडून शिक्षकांचा सन्मान होणे ही खूप अभिमानाची बाब असल्याची भावना व्यक्त केली. प्रस्ताविक डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार कल्लाप्पा पाटील यांनी मानले. यावेळी शहर व परिसरातून विविध क्षेत्रातील पदाधिकारी, नागरिक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा उत्साहात सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांचा सत्कार मोठ्या उत्साहात करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती मंगला बिऱ्हाडे उपस्थित होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती सुनिता पाटील यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांनी केले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. त्यामध्ये श्रीमती डॉ. अंजली चिंचोलीकर, श्रीमती अर्चना पंडित, श्रीमती मंगल निकम, श्रीमती शिल्पा माळोदे, श्रीमती मयुरी इंगळे, श्रीमती वैशाली ईश्वळे, श्रीमती संगीता वाघ, श्रीमती मंगल पवार, श्रीमती रिता श्रेष्ठ, श्रीमती पूजा शेळके, श्रीमती वर्षा बरसाळे, श्रीमती सय्यद लुबना , श्रीमती सुरेखा आक्षे, श्रीमती राखी ढोबळे, श्रीमती अर्चना पट्टेबहादूर, श्रीमती विशाखा रेवणवार, श्रीमती रेहाना शेख, श्रीमती मंदा मिसाळ आदींचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी कविता, गीत व भाषणाद्वारे शिक्षकांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात शिक्षक समाजाचे शिल्पकार असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते असे सांगितले. अध्यक्षांनी शिक्षक दिनाचे महत्व पटवून देत शिक्षकांचा पुष्प देऊन गौरव केला.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ सप्टेंबर २०२५


## ज्ञानरूपी प्रकाशदाता

गणराया आले घरा
जलधारा होत्या पाठी
सुकलेल्या पिकासाठी
अमृत होते धरणीसाठी

गणराया येता घरा
आनंदाचा वाही पूर
भक्ती शक्तीचा तो संगम
जीवनाचे शिकवी सार

तू सुखकर्ता तू दुखहर्ता
विघ्नहर्ता तू मुक्तिदाता
हे गणनायका तुच
ज्ञानरूपी प्रकाशदाता

मारुनी प्रदक्षिणामातेला
ब्रम्हांड ठेवले तिच्या चरणी
गणराया तू तत्वज्ञ
सर्व जगताचा ज्ञानी

जाता देवा विसर्जना
हुरहूर दाटते मनी
बाप्पा तुम्हाला सोडताना
अश्रू वाहतात नयनी

गणराया जाता देवनगरी
निरोप द्यावा महादेवा
उघडूनी नयन तिसरे
शिकवा धडा अत्याचारी मानावा

**संदिप वाकडे पाटील**
**रा खेडा ता.कन्नड**

## बाप्पा! तुला निरोप देताना

बाप्पा!तूला निरोप देताना
नि:शब्द झाल्या भावना,
तू आला घेऊनी पाऊस
अन् मिळाले जीवदान
कोवळ्या पिकांना..

बाप्पा!तू निर्गुण जरी निराकार
भक्तासाठी झाला साकार,
तू निर्मळ सत्य शिव सुंदर
साऱ्या विश्वाचा आधार..

गणाचा तू ईश, बुद्धीचा दायक
साऱ्याच दु:खाचा तूच निवारक,
तूच सुखकर्ता, अनादी अनंत
विद्येची देवता,सिद्धीचा नायक..

तूच गणराया आशेचा अंकुर
करू कसे सांग तुझे विसर्जन,
निरोप देताना मनी हुरहूर
वाट तुझी पाहतो पुन्हा गजानन..

**ज्ञानेश्वर गायके,कन्नड**
**मो.9403384889**

# बुद्धीष्ट सर्किट निर्माण करणे हे मानवतावादी कार्य - डॉ ऋषिकेश कांबळे



**छ.संभाजीनगर :** सोनवणे फाउंडेशन नाशिक च्यावतीने छ.संभाजीनगर येथे हायप्रोफाइल बुद्धिस्ट टूर चे उद्घाटन डॉ ऋषिकेश कांबळे यांच्या हस्ते आज दिनांक ५/९/२०२५ रोजी २८ कॉस्मो अवेनुए बाबा पेट्रोल पंप जवळ करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ बापुसाहेब सोनवणे हे होते . हायप्रोफाइल बुद्धिस्ट टूर च्या माध्यमातून लंडन, अमेरीका, जपान, ऑस्ट्रेलिया ,श्रीलंका, थायलंड, भूतान , म्यानमार, कंबोडिया, लाओस, व्हिएतनाम येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजन केले जाते. यापुढे जागतिक बुद्धिस्ट सर्किट निर्माण करून जगभरातील बुद्धीष्ट पर्यटन स्थळ जोडण्याचे काम सोनवणे फाऊंडेशन करत आहे. यातून जगभर मानवतेचा संदेश जाऊन जागतिक शांतता निर्माण होण्यास मदत होईल. असे डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी म्हटले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ बापुसाहेब सोनवणे म्हणाले छ. संभाजीनगर परिसरातील नागरिकांना जगभरातील बुद्धीष्ट पर्यटन स्थळाशी जोडण्याचे काम सोनवणे फाऊंडेशन करणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ मोहन सौंदर्य यांनी केले तर आभार डॉ युवराज धबडगे यांनी केले. यावेळी डॉ भगवान कांबळे, डॉ राहुल मस्के, डॉ बाळासाहेब गायकवाड, श्रीरंग साळवे, डॉ दिलीप वाघ, डॉ जितेंद्र शेजवळ, डॉ मिलिंद वाहूळ,डॉ बाळासाहेब लिहिणार, प्रा दिनेश मगरे, डॉ सुधाकर नवसागर, डॉ हसन इनामदार ,दिनकर म्हस्के, भाऊसाहेब सोनवणे, चंद्रकांत मोरे, विक्रम गवळी, बालाजी जाधव,बालाजी, गिमेकरआदी उपस्थित होते.

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय आणि एनसीन एंटरप्रेनरशिप, स्टार्टअप अँड इनोव्हेशन फोरम यांच्यात सामंजस्य करार




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा फोरम, पुणे यांच्यात उद्योजकतेला चालना देण्यासाठी आणि स्थानिक स्टार्टअप इकोसिस्टमचा विकास घडवून आणण्यासाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला.या करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, आणि एनसीन एंटरप्रेनरशिप स्टार्टअप अँड इनोव्हेशन एन्सिन फोरमचे संचालक श्री. संजय जगताप, व समन्वयक श्री. ईश्वर मुगळे यांनी सह्या केल्या. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा आणि एनसीन एंटरप्रेनरशिप स्टार्टअप अँड इनोव्हेशन एन्सिन फोरम, पुणे यांच्यात उद्योजकतेला चालना देण्यासाठी आणि स्थानिक स्टार्टअप इकोसिस्टमचा विकास घडवून आणण्यासाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अस्वले यानी केले.यावेळी उपप्राचार्य डॉ पीटले, इन्क्युबेशन सेंटरचे प्रमुख डॉ. अशोक पदमपल्ले, IQAC प्रमुख डॉ. व्ही. डी. देवरकर, केमिस्ट्री विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी, करिअर कट्टा समन्वयक डॉ एस पी पसरकल्ले, डॉ एस टी. तोडकर यांची उपस्थिती होती.या सहकार्याचा मुख्य उद्देश महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकता संस्कृतीला प्रोत्साहन देणे, तरुणांना यशस्वी उद्योजक व रोजगारनिर्माते बनण्यासाठी मार्गदर्शन करणे, तसेच त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे शाश्वत आणि स्केलेबल स्टार्टअप्समध्ये रूपांतर करण्यासाठी आवश्यक इकोसिस्टम विकसित करणे असून या सामंजस्य कराराअंतर्गत, दोन्ही संस्था पुढील क्षेत्रांमध्ये उद्योजक व नवप्रवर्तकांना सशक्त पाठबळ देतील. यासाठी स्टार्टअप्ससाठी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन, सह-कार्य क्षेत्राची उपलब्धता, तांत्रिक सहाय्य व संसाधनांचे वितरण, प्री-इन्क्युबेशन व इन्क्युबेशन सेवा, निधी मिळवण्यासाठी सहाय्य, नेटवर्किंग व औद्योगिक सहकार्याच्या संधी असे उपक्रम हाती घेतले जाणार आहेत त्यामुळे ग्रामीण विद्यार्थी युवक याना सशक्त आणि प्रगतीशील स्टार्टअप्स उभारण्यास मदत होईल, हा सामंजस्य करार स्थानिक व प्रादेशिक स्तरावर स्टार्टअप इकोसिस्टम घडवण्यासाठी एक दिशादर्शक प्रयत्न ठरेल. नवउद्योजकांना योग्य दिशा, प्रेरणा आणि समर्थन मिळवून देण्यासाठी हे सहकार्य मोलाची भूमिका बजावेल असे मनोगत फोरम संचालक डॉ जगताप आणि प्राचार्य डॉ अस्वले यानी केले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ सप्टेंबर २०२५


# साक्षरतेचा प्रकाश : समाजपरिवर्तनाची नवी दिशा

दरवर्षी 8 सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगभर 'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षण ही माणसाची मूलभूत गरज आणि हक्क आहे, या जाणिवेतून युनेस्कोने 1966 मध्ये या दिनाची घोषणा केली आणि 1967 पासून त्याचे औपचारिक साजरीकरण सुरू झाले. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रत्येक व्यक्तीला वाचन-लेखनाच्या मूलभूत कौशल्याने सुसज्ज करणे आणि त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे. आजच्या युगात साक्षरता ही फक्त वाचता-लिहिता येण्यापुरती मर्यादित न राहता विचार करणे, संवाद साधणे, निर्णय घेणे आणि समाजातील प्रगतीशील प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची ताकद देणारी शक्ती बनली आहे.

भारतीय समाजाचा विचार केला तर शिक्षण आणि साक्षरतेच्या प्रवासात अनेक अडथळे आले. प्राचीन काळातील गुरुकुल शिक्षणपद्धतीत केवळ काही उच्चवर्णीयांनाच ज्ञान मिळण्याचा अधिकार होता. दलित, शूद्र, आदिवासी आणि स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. या अन्यायकारक व्यवस्थेला छेद देण्यासाठी समाजसुधारकांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहास घडवला. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सर्वप्रथम स्त्रीशिक्षणाचा दीप प्रज्वलित केला. राजर्षी शाहू महाराजांनी वंचितांसाठी मोफत शिक्षणाची दारे खुली केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा महामंत्र दिला. या थोर नेत्यांच्या कार्यातून शिक्षण सर्वांसाठी खुले झाले आणि आजच्या साक्षर भारताचा पाया रचला गेला.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय राज्यघटनेत शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून मान्यता मिळाला. शासनाने प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी विविध योजना राबवल्या. 1951 मध्ये भारतातील साक्षरतेचे प्रमाण अवघे 18 टक्के होते. 2011 च्या जनगणनेनुसार ते सुमारे 74 टक्क्यांवर पोहोचले. पुरुष साक्षरता 82 टक्के आणि स्त्री साक्षरता 65 टक्के एवढी नोंदली गेली. जरी हे प्रमाण वाढले असले तरी अजूनही अनेक दऱ्या उरल्या आहेत. ग्रामीण व शहरी भागातील तफावत, स्त्री-पुरुषांमधील अंतर, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजांतील कमी साक्षरता ही मोठी आव्हाने आहेत.

साक्षरतेचे महत्त्व केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नाही. निरक्षर समाजामध्ये अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य, विषमता, बालविवाह आणि बालमजुरी यांचे प्रमाण अधिक आढळते. शिक्षणामुळे माणूस आपल्या हक्कांबाबत जागरूक होतो, जबाबदाऱ्या पार पाडतो, पर्यावरण संवर्धनाची जाणीव ठेवतो आणि आरोग्याच्या दृष्टीने सुज्ञ निर्णय घेतो. साक्षरतेमुळे कुटुंबाचे जीवनमान उंचावते, समाजात सौहार्द निर्माण होते आणि राष्ट्राची प्रगती वेगाने घडते. म्हणूनच साक्षरता ही राष्ट्रीय विकासाची गुरुकिल्ली मानली जाते.

आजच्या काळात 'डिजिटल साक्षरता' ही नवी संकल्पना उदयास आली आहे. इंटरनेट, संगणक, मोबाईल, ई-गव्हर्नन्स, ऑनलाईन शिक्षण आणि डिजिटल व्यवहार या गोष्टी दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. मात्र या तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करण्यासाठी आवश्यक कौशल्यांचा अभाव अजूनही ग्रामीण भागात आणि वंचित समाजात जाणवतो. डिजिटल दरी मिटवली नाही तर समाजात नव्या प्रकारची विषमता निर्माण होऊ शकते. म्हणूनच पारंपरिक साक्षरतेबरोबर डिजिटल साक्षरतेवरही भर देणे आवश्यक आहे.

स्त्री साक्षरतेचा मुद्दा विशेषतः महत्त्वाचा आहे. एका साक्षर स्त्रीमुळे संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होते. ती आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्नशील राहते, आरोग्याबाबत जागरूक असते आणि आर्थिक व्यवस्थापनातही हातभार लावते. ग्रामीण भागातील लवकर लग्न, गरिबी, घरगुती जबाबदाऱ्या या कारणांमुळे मुलींचे शिक्षण खंडित होते. त्यामुळे मुलींसाठी शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण, सुरक्षित शालेय वातावरण या गोष्टी प्राधान्याने उपलब्ध करून द्यायला हव्यात. समाजाच्या प्रगतीसाठी स्त्री-पुरुष साक्षरतेत समतोल साधणे हे अत्यावश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन आपल्याला आठवण करून देतो की शिक्षण हा प्रत्येकाचा मानवी हक्क आहे. कुणालाही जाती, धर्म, भाषा, प्रदेश किंवा लिंगावरून शिक्षणाच्या संधी नाकारल्या जाऊ नयेत. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार 2030 पर्यंत सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण हे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी शासन, स्वयंसेवी संस्था, स्थानिक समाज, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

आज शिक्षणाला रोजगाराशी जोडणे ही मोठी गरज आहे. फक्त पदवी मिळवून चालत नाही, तर रोजगारक्षम कौशल्ये मिळवणे गरजेचे आहे. व्यावसायिक शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकतेसाठी प्रशिक्षण या गोष्टींना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. साक्षरतेबरोबर उपयुक्त कौशल्ये प्राप्त झाल्यास व्यक्ती आत्मनिर्भर बनतो आणि इतरांसाठीही संधी निर्माण करू शकतो.

लोकशाही मजबूत करण्यासाठी साक्षरतेची भूमिका अनन्यसाधारण आहे. साक्षर नागरिकच आपल्या मताधिकाराचा योग्य उपयोग करू शकतो, शासनाच्या धोरणांवर लक्ष ठेवू शकतो आणि समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवू शकतो. निरक्षरतेमुळे लोकशाही प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. म्हणूनच साक्षरतेचा प्रसार हा लोकशाहीच्या बळकटीकरणाशी थेट संबंधित आहे.

साक्षरतेसमोरील आव्हाने अजूनही गंभीर आहेत. शालेय गळती दर कमी करणे, गुणवत्तापूर्ण शिक्षक उपलब्ध करणे, ग्रामीण-शहरी दरी कमी करणे, भटक्या-विमुक्त जाती-जमाती व आदिवासींसाठी विशेष सुविधा पुरवणे, बालमजुरी व बालविवाह रोखणे, डिजिटल शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करणे ही मोठी आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी शासकीय प्रयत्नांबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे खरे यश हे केवळ औपचारिक कार्यक्रमात नाही, तर प्रत्यक्ष कृतीत आहे. निरक्षरतेचे उच्चाटन करण्यासाठी गावोगावी जनजागृती मोहीमा राबवणे, मोफत शिकवणी वर्ग सुरू करणे, वाचनालये व डिजिटल लायब्ररी उपलब्ध करून देणे, मोबाइल ॲप्सद्वारे मोफत शैक्षणिक साधनसामग्री देणे, हे उपक्रम गरजेचे आहेत. पालकांनी मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा, माध्यमांनी शिक्षणाच्या चळवळीला हातभार द्यावा, ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

ज्ञानाचा प्रकाश एकदा पेटवला की तो पिढ्यान्पिढ्या मार्गदर्शक ठरतो. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की साक्षरतेशिवाय प्रगती शक्य नाही. आज आपण हा दिवस साजरा करतो, पण तो फक्त घोषणाबाजीपुरता न राहता प्रत्यक्ष कृती आराखड्यात बदलायला हवा. शिक्षणाचा दीप प्रत्येक घराघरात पोहोचला तरच समाज खऱ्या अर्थाने प्रगत, समतोल आणि न्याय्य बनेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582, ईमेल –**
**bagate.rajendra४@gmail.com**


# पोलिसांना आडनाव लावता येत नसेल, तर ही सामाजिक समता आहे का? धनंजय मुंडे



**बीड** : समाजाने महापुरुषांना जातीपुरते मर्यादित करू नये, असे आवाहन आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे. ते म्हणाले की, जर पोलिसांना त्यांच्या नावासमोर आडनाव लावता येत नसेल, तर ती कसली सामाजिक समता? समाजात आजही जातीभेद मोठ्या प्रमाणात असून, महापुरुषांच्या विचारांवर चालण्याची गरज आहे. बीड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी सध्याच्या सामाजिक वातावरणावर चिंता व्यक्त केली.

धनंजय मुंडे म्हणाले की, आपल्या जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील अनेक ठिकाणी सामाजिक समता उरलेली नाही. बीड जिल्ह्यामध्ये पोलिसांना सुद्धा स्वतःच आडनाव लावता येत नसेल तर ही सामाजिक समता आहे का? ही परिस्थिती चिंताजनक असून, मला हे सांगताना लाज वाटते. समाजात पुन्हा समतोल निर्माण करण्याची गरज आहे. मागे जे बिघडलं ते सरळ करण्यासाठी सर्व समाजातील लोकांनी पुढे येणं गरजेचं आहे.

धनंजय मुंडे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे रयतेचे राज्य अठरापगड जातींसाठी होते, केवळ एका समाजासाठी नव्हे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानही संपूर्ण देशासाठी आहे, फक्त काही वर्गापुरते नव्हे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

धनंजय मुंडे म्हणाले की, सर्व महापुरुष हे संपूर्ण समाजासाठी कार्यरत होते. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती फक्त मराठा समाजानेच साजरी करायची का? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती फक्त मागासवर्गीयांनी? महात्मा फुले यांचे शिक्षणाचे कार्य केवळ माळी समाजापुरतेच मर्यादित होते का? भगवान बाबांची जयंती फक्त वंजारी समाजानेच साजरी करायची का? अशा स्वरूपाचे प्रश्न उपस्थित करून, महापुरुषांना जातीत अडकवण्यावर त्यांनी टीका केली आहे.